**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तलाठी महापदभरती-२०१९**

## जाहिरात

जालना जिल्हयासाठी महापरीक्षा पोर्टलमार्फत राज्यातील गट-क संवर्गातील तलाठी पदासाठी सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील नमूद पदांची सरळसेवा भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

**जालना जिल्हानिहाय रिक्त पदांचा आरक्षण निहाय तक्ता**

| प्रवर्ग | रिक्त व भरावयाची पदे | सर्वसाधारण | महिला (३० %) | खेळाडू (५%) | माजी सैनिक (१५ %) | प्रकल्पग्रस्त (५%) | भूकंपग्रस्त (२%) | अपंग (३ %) | पदवीधर अंशकालीन (१०%) | अनाथ (१%) | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| अ.जा. | ४ | २ | १ | ० | १ | ० | ० | | ० | ० | ४ |
| अ.ज. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० |
| वि.जा.अ. | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | १ |
| भ.ज.ब. | ३ | २ | १ | ० | ० | ० | ० | | ० | ० | ३ |
| भ.ज.क. | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | | ० | ० | २ |
| भ.ज.ड. | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ (कर्णबधीर) | ० | ० | १ |
| वि.मा.प्र. | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | १ |
| इ.मा.व. | १० | ४ | ३ | १ | १ | ० | ० | | १ | ० | १० |
| एसईबीसी | ४ | २ | १ | ० | १ | ० | ० | | ० | ० | ४ |
| आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० |
| खुला | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | १ |
| एकूण | २७ | १५ | ७ | १ | ३ | ० | ० | | १ | ० | २७ |

- ❖ वरील पदासाठी महापरीक्षा पोर्टलमार्फत खालील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे त्या-त्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडून सदर **जाहिरातीद्वारे दि. ०१.०३.२०१९ रोजी रात्री १०.०० वा.पासून दि. २२.०३.२०१९ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंतच्या कालावधीत** www.mahapariksha.gov.in **या** महापरीक्षा पोर्टलच्या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

- ❖ याद्वारे, असे देखील आवाहन करण्यात येते की, जाहिरात प्रसिध्दीच्या दिवसापर्यंत म्हणजेच **दि. २८.०२.२०१९ रोजी,** सदर जाहिरातीमध्ये नमुद पदांसाठी आवश्यक अर्हता/पात्रता धारण करीत नसलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करु नयेत.

- ❖ **तलाठी ( पेसा क्षेत्रातील ) पदांसाठी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना-**

  (१) पेसा (PESA) क्षेत्रातील तलाठी पदे म्हणजेच अनुसूचित क्षेत्रातील तलाठी पदे होय.

(२) शासन अधिसूचना क्र.आरबी/टीसी/ई-१३०१३ (४) नोटिफिकेशन-१४७४/२०१४ दि.९/६/२०१४ नुसार सदर पदे आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनूसचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्यात येतील.

(३) स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार याचा अर्थ **"जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा संबंधित जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत"** असा होय.

(४) अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा संबंधित जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये दि.२६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत. असे उमेदवार तलाठी (पेसा क्षेत्रातील) पदासाठी अर्ज करु शकतील.

❖ **टिप-**

(१) **आंतरविभागीय / आंतरजिल्हा बदलीने काही तलाठी कर्मचारी संबंधित जिल्हा आस्थापनेवर आल्यास किंवा बदलीने अन्य जिल्ह्यात / विभागात गेल्यास जाहिरातीतील नमुद पदांच्या संख्येमध्ये कमी / जास्त बदल होण्याचा संभव आहे. सबब, या अनुषंगाने उमेदवारांची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. याबाबतचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी यांना राखून ठेवण्यात आलेले आहेत.**

(२) जाहिरातीमध्ये नमूद पदांच्या संख्येमध्ये अतिरिक्त संवर्ग कक्ष, आंतरविभागीय समायोजन, **विभागीय बदली** व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी आणि अन्य कारणांमुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी /जास्त होणे) व जात निहाय आरक्षण किंवा समांतर आरक्षणांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

(३) उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावर ठेवण्यात येत असलेल्या बिंदुनामावली तपासणीअंती दर्शविण्यात आलेल्या अनुशेषानुसार वरील रिक्त पदसंख्या दर्शविण्यात आलेली आहे.

(४) शासनाने भरती बाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेली अधिसूचना, शासन निर्णय परिपत्रके, आदेश इत्यादी लागू राहतील.

❖ **महत्वाच्या अटी व शर्ती -**

१) जाहिरातीमध्ये नमूद समांतर आरक्षणानुसार महिला, माजी सैनिक, पदवीधर अंशकालीन उमेदवार, खेळाडू, प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त प्रवर्गातील उमेदवारांना नियमानुसार देय असलेल्या सवलती देणेत येतील.

२) जाहिरातीमध्ये नमूद पदे पदोन्नतीने, सेवानिवृत्तीने, राजीनामा, आंतरविभाग/जिल्हा बदली इत्यादीने रिक्त झालेली आहे. तसेच माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत सभांव्य रिक्त होणाऱ्या पदांचाही समावेश वरील रिक्त पदांमध्ये करण्यात आलेला आहे.

३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिमा१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ, दि.१३ जून २०१८ मधील तरतूदीनुसार, सदरची पदे भरण्यासाठी अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूची ही सदर याद्या प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष मुदतीसाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधी ग्राहय ठरेल. तद्नंतर ही निवडयादी व प्रतिक्षायादी व्यपगत होईल.

४) समांतर आरक्षणांतर्गत त्या-त्या प्रवर्गासाठी विहित केलेल्या टक्केवारीनुसार वाटप निश्चितपणे मिळणेसाठी त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांतून जागा भरणेत येतील.

५) सदर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही.

परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, परीक्षेच्या कार्यक्रमामध्ये अंशत: बदल करणे तसेच सेवा भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनास राहतील.

६) वरील रिक्त पदांच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आलेली रिक्त पदे ही डिसेंबर, २०१९ पर्यंत रिक्त होणारी पदे विचारात घेऊन दर्शविण्यात आलेली असल्याने जशी जशी प्रवर्गनिहाय पदे रिक्त होतील त्यानुसार निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

७) **माजी सैनिकांबाबत** Government of India, Ministry of Personnel PG & Pensions (Department of Personnel & Treaining)No.३६०३४/५/८५-Estt (SCT), New Delhi दि.२७ ऑक्टोबर, १९८६ च्या राजपत्रानुसार सैनिक दलात कार्यरत असतांना ०१ वर्ष अगोदर माजी सैनिक या समांतर आरक्षणांतर्गत राखीव असलेल्या पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास नियुक्तीचे अधिकार हे संबंधित जिल्हा निवड समिती यांना राहतील.

८) **अपंग उमेदवारांबाबत** - शासन, सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.२. दि.१८/३/२०१४ मधील सुचनेनूसार अपंग व्यक्तींना लेखनिकाची आवश्यकता असल्यास त्या उमेदवारास स्वत: लेखनिकाची व्यवस्था करता येईल तथापी संबंधीत उमेदवाराने अर्ज भरतांना सदर बाबीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. सदर परीपत्रकानुसार अपंग उमेदवारास जादा वेळ देण्यात येईल.

९) **शैक्षणिक अर्हता** - जाहिरातीमध्ये नमुद पदांसाठी अर्ज करणेकामी जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी म्हणजे दि.२८.०२.२०१९ रोजी उमेदवाराने पुढील प्रमाणे शैक्षणिक अर्हता पूर्णत: धारण करणे आवश्यक आहे.

- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचेकडील दि.१ जुलै २०१० च्या अधिसूचनेनुसार उमेदवार कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा.
- शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) क्र.मातंस-२०१२/प्र. क्र.२७७/३९, दि.४/२/२०१३ मध्ये नमूद केल्यानुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ नुसार संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून २ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.
- मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.
    - माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

❖ **खेळाडू उमेदवारांसाठी आवश्यक अर्हता** - जाहिरातीमध्ये नमूद पदांसाठी अर्ज सादर करणाऱ्या खेळाडू उमेदवारांसाठी खालील प्रमाणे अर्हता धारण करणे / असणे आवश्यक आहे.

१) खेळाडू हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याला मराठी भाषेचे ज्ञान असावे.

२) खेळाडूने सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

३) खेळाडुंसाठी आरक्षणाबाबत क्रिडाविषयक अर्हता ही शासन निर्णय दि.१ जुलै २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक दि.१० ऑक्टोंबर २०१७ नुसार ग्राहय धरण्यात येईल. शासन निर्णय दि.१ जुलै २०१६ मधील तरतुदीनुसार अर्जासोबतच क्रिडा विषयक प्रमाणपत्राची संबंधीत विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक कल्याण यांचेकडील पडताळणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. वरील शासन निर्णय तसेच दि.१५ नोव्हेंबर २०१७ च्या शुध्दीपत्रकासोबतच्या परिशिष्टात नमूद क्रिडा प्रकार व योग्यता व अर्हता खेळाडुंनी धारण करणे आवश्यक आहे.

- **माजी सैनिकांच्या अर्हतेबाबत** – पदवी परीक्षा ही पात्रता असलेल्या आणि तांत्रिक अथवा व्यावसायिक कामाचा अनुभव आवश्यक ठरविलेला नसलेल्या पदांच्या बाबतीत १५ वर्षे सेवा झालेल्या माजी सैनिकांनी एस.एस.सी. उत्तीर्ण असल्याचे किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र असल्यास ते अशा पदांना अर्ज करुन शकतात.

- **वयोमर्यादा** - जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी **दि. २८.०२.२०१९** रोजीचे वय गणण्यात येईल.

| क्र. | पदाचे नांव | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी** | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२,दि.२५ एप्रिल, २०१६ मधील तरतुदीनुसार किमान १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| २ | **मागासवर्गीय उमेदवारांसाठी** | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२,दि.२५ एप्रिल, २०१६ मधील तरतुदीनुसार किमान १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. तथापी उन्नत व प्रगत गटांमध्ये क्रिमीलेयर (Creamy Layer) मोडणाऱ्या वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र, इ.मा.व., एस.ई.बी.सी.आणि ई.डब्ल्यु.एस. (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) प्रवर्गातील उमेदवारांना ही वयाची सवलत लागू राहणार नाही. |
| ३ | **पदवीधारक/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी** | शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.अशंका-१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दि.२ जानेवारी २०१९ मधील तरतूदीनुसार, कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष राहील. |
| ४ | **स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतर निवडणूक कर्मचारी यांचेसाठी** | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी देखील उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. |
| ५ | **खेळांडू उमेदवारांसाठी** | शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१.७.२०१६ मधील तरतुदीनूसार, खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या विहित वयोमर्यादेत ०५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. तथापि, उच्चतम वयमर्यादा ४३ इतकी राहील. |
| ६ | **अपंग उमेदवारांसाठी** | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ, दि.१६/६/२००१ मधील तरतुदीनुसार, उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्ष इतकी राहील. तथापि, अंपग प्रवर्गातील उमेदवारांचे किमान अपंगत्वाचे प्रमाणे ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकिय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे. |
| ७ | **प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी** | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि.३/२/२००७ मधील तरतुदीनुसार, कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. सदर वयोमर्यादा |

| | | |
|---|---|---|
| | | सरसकट शिथील केली असल्याने, मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनाही कमाल वयोमर्यादेबाबत ४५ वर्षापर्यंतची सवलत राहील. |
| ८ | **माजी सैनिक उमेदवारांसाठी** | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/८/२०१० मधील तरतुदीनूसार माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच, अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यत राहील. |

❖ **परीक्षेचे स्वरुप व त्या अनुषंगिक सूचना -**

| **क्र.** | **पदाचे नाव** | **मराठी** | | **इंग्रजी** | | **सामान्य ज्ञान** | | **बौध्दीक चाचणी / अंकगणित** | | **एकुण गुण** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्रश्न** | **गुण** | **प्रश्न** | **गुण** | **प्रश्न** | **गुण** | **प्रश्न** | **गुण** | **प्रश्न** | **गुण** |
| **१** | **तलाठी** | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | १०० | २०० |

❖ **परिक्षेचे स्वरुप :-**

१) **लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक ०२ गुण ठेवण्यात येतील.**

२) **तलाठी पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांसाठी** - शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रनि.म.१२१६/प्रक्र६५/१६/१३-अ, दि.१३/०६/२०१८ मधील तरतुदीनुसार तलाठी पदासाठी पदवी ही कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शांलात परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकुण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

३) शासन निर्णय, महसूल वन विभाग क्र.प्रानिमं-२००९/प्र.क्र.३५६/ई-१०, दि.०१/०१/२०१० मधील तरतुदीनुसार व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रनिम-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ दि.१३/०६/२०१८ मधील तरतुदीनूसार या पदांकरीता मौखिक परीक्षा(मुलाखती) घेण्यात येणार नाहीत.

४) उमेदवारांची निवडसूची तयार करणेसाठी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ, दि.१६/३/१९९९ आणि शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण१११८/प्रक्र.३९/१६-अ, दि.१९/१२/२०१८ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रनिम-१२१६/प्रक्र६५/१६/१३-अ दि.१३/०६/२०१८ मधील तरतुदीनूसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

६) परीक्षेचा निकाल (निवडसुची) तयार करतांना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रनिम-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ, दि.१३/०६/२०१८ मध्ये नमुद निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल.

❖ **परीक्षा शुल्काची आकारणी व शुल्क भरणा प्रक्रिया :-**

सदर भरती प्रक्रियेत खालील प्रमाणे शुल्क आकारले जाणार असून सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील.

| अ.क्र. | पदाचे नांव | आवश्यक परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग (मागास प्रवर्ग व आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) |
| १ | तलाठी पेसा क्षेत्राबाहेरील | रक्कम रुपये ५००/- | रक्कम रुपये ३५०/- |
| २ | तलाठी पेसा क्षेत्रातील | --- | रक्कम रुपये ३५०/- |

माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

❖ **समांतर आरक्षणांतर्गत असलेल्या कोटयातील पदांसाठी अटी व शर्ती-**

१) **महिला आरक्षण** - शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्र.८२/२००१/मसेआ-२००/प्र.क्र.४१५ /का.२, दि.२५/५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळावेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी सन २०१८-२०१९ या कालावधीकरीता वैध असलेले (दि.३१/०३/२०१९ पर्यंत वैध असलेले) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२) **माजी सैनिक आरक्षण** - गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास मुळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत. माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करतांना युध्द काळात किंवा युध्द नसतांना सैन्यातील सेवेमुळे अपंग झाल्यास माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यात येईल.

३) **पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार आरक्षण** - शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि२७.१०.२००९ व क्र.अशंका-१९१३/प्र.क्र.५७/२०१३ /१६-अ, दि.१९.९.२०१३ नूसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४) **अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू** - खेळाडुंसाठी आरक्षणाबाबत क्रिडाविषयक अर्हता ही शासन निर्णय दि.१ जुलै २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक दि.१० ऑक्टोंबर २०१७ नुसार ग्राहय धरण्यात येईल. शासन निर्णय दि.१ जुलै २०१६ मधील तरतुदीनुसार अर्जासोबतच क्रिडा विषयक प्रमाणपत्राची संबंधीत विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक कल्याण यांचेकडील पडताळणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. वरील शासन निर्णय तसेच दि.१५ नोव्हेंबर २०१७ च्या शुध्दीपत्रकालगत परिशिष्टात नमुद क्रिडा प्रकार व योग्यता व अर्हता खेळाडुंनी धारण करणे आवश्यक आहे.

५) **प्रकल्पग्रस्त उमेदवार आरक्षण** - गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

६) **भूकंपग्रस्त उमेदवार आरक्षण** - गुणवत्तायादी मध्ये येणाऱ्या भुकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील भुकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या भुकंपग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र हे संबधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले

जाईल. सदर पडताळणीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल

७) **अपंग आरक्षण** - शासन परीपत्रक, महसुल व वन विभाग, आरईएन-२८९२/प्र.क्र.१२७/ई-१०, दि.१०.७.२००८ मध्ये नमूद अंपग प्रवर्गातील उमेदवारांचे किमान अपंगत्वाचे प्रमाण ४०% असल्याबाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे मुळ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

❖ **पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, आवश्यक कागदपत्रे तसेच इतर महत्वाच्या अटी व शर्ती.**

१) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याच्याकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२) तलाठी पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०. दि.२७ जून २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्याचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांतदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

३) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

४) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना ज्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडीअंती सादर करणे आवश्यक आहे.

५) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पूरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

६) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.२९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र, इ.मा.व, यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे **दि.३१ मार्च, २०१९** पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलेअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील. तसेच (राज्यातील शैक्षणिक संस्थामधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याचे नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्तींचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम -२०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२) नुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व एस.ई.बी.सी. यांना

लागू आहे. व सामान्य प्रशासन विभाग दि.१२.०२.२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार ई.डब्ल्यु.एस. (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) यांना आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र देणे गरजेचे राहील.

७) उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

८) एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

९) समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ. दि.१६/३/१९९९ आणि शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण१११८/प्रक्र.३९/१६-अ दिनांक १९/१२/२०१८ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

१०) नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दि.२१/१०/२००५ नुसार लागु करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागू राहील. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण),नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू राहणार नाही.

१२) अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूची मध्ये समावेश झालेल्या उमेदवारांनी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे -

(I) पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(II) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२००० /१२ दि.२८/०३/२००५ व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०००/ प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१/७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ अन्वये दि.२८/३/२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्ये बाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारानेही विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

(III) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा.उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non Creamylayer) प्रमाणपत्र, ई.डब्ल्यु.एस. उमेदवारांना (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) यांना आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी पात्रता प्रमाणपत्र, इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.

१३) अंतिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१४) उमेदवाराने लेखी परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतरिम निवडसूची तयार केली जाईल. अंतरिम निवडयादीमधून पदांच्या आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवडसूची तयार केली जाईल.

१५) विहित शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा धारण करणाऱ्या इच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

| **अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :-** | |
|---|---|
| **१)** | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉग-इन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या ' सूचना या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. (Activation लिंक ही 2 दिवसांकरिता activate असेल.) उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल.<br>टीप : USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल . |
| **२)** | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| **३)** | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे.<br>(टिप :- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .) |
| **४)** | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा.कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी. |
| **५)** | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.<br>उमेदवार जर ST प्रवर्गात मोडत असेल तर त्यास तो ST-PESA प्रवर्गामध्ये अर्ज करू इच्छितो का नाही याची निवड करावी लागेल. उमेदवार हा एका वेळी फक्त एका जिल्हासाठी अर्ज करू शकतो, जर आपण ST-PESA प्रवर्गातुन अर्ज करत असाल तर आपण फक्त आपल्या ST-PESA जिल्हाच्या विभागासाठी अर्ज करू शकता दुसऱ्या कुठल्याही विभागाकरिता ST-PESA मधून अर्ज करू शकत नाही. जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आल्यास त्याचा कालक्रमानुसार पहिला अर्ज ग्राह्य धरण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ६) | उमेदवाराने तलाठी या पदाकरिता अर्ज करत असताना त्याला ज्या जिल्ह्याच्या पदाकरिता अर्ज करावयाचा आहे तो जिल्हा काळजीपूर्वक निवडणे गरजेचे आहे. (इथे निवडत असलेला जिल्हा आणि तुम्ही तुमच्या पत्त्यामध्ये निवडत असलेला जिल्हा यांचा कुठलाही संबंध नाही.)<br>उमेदवाराने खाली नमूद केलेल्या फील्ड करीत जिल्ह्याची निवड करावी.<br>**English: Please select the district you want to apply:**<br>**Marathi: आपण अर्ज करू इच्छित असलेला जिल्हा निवडा.**<br>आपण अर्ज सबमिट केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव या फील्ड मध्ये बदल केला जाणार नाही किंवा तशी विनंती स्वीकारली जाणार नाही. |
| ६) | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी . समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल. |
| ७) | मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार लागू असल्यास) यासंबंधीची माहिती द्यावी लागेल. |
| ८) | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| ९) | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक रावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| १०) | आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल. ( तलाठी/ Talathi) |
| ११) | त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |
| १२) | उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल. |
| १३) | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (इंटरनेट बँकिंग, क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड, भीम UPI) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. |
| १४) | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री १२.०० वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. |
| १५) | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली |

| | |
|---|---|
| | यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८००३०००७७६६ वर कॉल करा.<br>**नोंद :-** नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) , पसंतीचे स्थान, जन्मतारीख उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-** | |
| १) | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| २) | अर्ज प्रिंट करण्यासाठी **"प्रिंट प्रिव्हयू"** या पर्यायावर क्लिक करा.<br>नोंद :उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वतः जवळ ठेवावा. |
| **महत्त्वाच्या सूचना:** | |
| | 1) उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.<br>2) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>3) उमेदवार जे वेगवेगळे विभाग/वेगवेगळ्या पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग/पदे यांकरिता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी. अन्यथा वेगवेगळ्या पदांसाठीच्या परीक्षेसाठी वेगवेगळे परीक्षा केंद्र/शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>4) उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.<br>5) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>6) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.<br>७) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्र आणि मूळ ओळखपत्रासह (उदा.वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पुस्तक) परीक्षा सुरु होण्यापूर्वी नव्वद मिनीटे अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणाऱ्या, प्रवेशपत्र व ओळखपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. |

**जिल्हाधिकारी जालना करिता**